# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक ३०/०६/२०१८**

## १) घरफोडी :-

**अ) भाग्यनगरः-** दिनांक २८.०६.२०१८ चे २०.०० ते दि.२९.०६.२०१८ चे १०.३० वा. चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी, पृथ्वीराज अपार्टमेंट पुर्णा रोड नांदेड येथे यातील फिर्यादी हे घराला कुलूप लावुन नातेवाईक आजारी असल्याने गेले असता अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे संडास व बाथरुमचे खिडकीचे लोखंडी रॉड तोडुन घरात प्रवेश करुन सुटकेस मध्ये ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने व नगदी ५,०००/-रु व सोनी कंपणीचा एल.ई.डी. टी. व्ही. असा एकुण ६०,४६८/- रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी गोविंद भगवान सानप, वय ३४ वर्षे व्यवसाय नौकरी रा. पृथ्वीराज अपार्टमेंट पुर्णा रोड नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भाग्यनगर** गुरनं. २००/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/२१८७ व्ही. पी. आल्लेवार, मो.नं. ९१५८७५६०८७** हे करीत आहे.

**ब) वजिराबादः-** दिनांक २८.०६.२०१८ चे २१.०० ते दि.२९.०६.२०१८ चे ०८.०० वा. चे दरम्यान, उत्तरवार कॉम्पलेक्स डॉलेन ऋषीकेश हॉस्पीटल नांदेड येथे यातील फिर्यादी हा हॉस्पीटल बंद करुन घरी गेले व परत हॉस्पीटलला आले असता कुणीतरी अज्ञात चोरटयाने हॉस्पीटलचे शटरचे लॉक तोडुन आत प्रवेश करुन मेडीकल स्टोअरचे शटर उघडुन कॅश काऊंटर मधुन नगदी ३०,४५०/- रु हॉस्पीटल मधील सिसीटीव्ही रेकॉर्डर व एम्पलीफायर किंमत अंदाजे २५,०००/- रु असा एकुण ५५,५४०/- रुपयाचा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी ऋषीकेश रविराज माहेश्वरी, वय ३२ वर्षे व्यवसाय डॉक्टर, रा. यशवंतनगर नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. वजिराबाद** गुरनं. १६१/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/के. एस. पठारे, मो.नं. ८८८८८१०९५७** हे करीत आहे.

## २) मो. सा. चोरी :-

**शिवाजीनगर :-** दिनांक १७.०६.२०१८ चे २१.०० ते दि. १८.०६.२०१८ चे ०७.०० वा. चे दरम्यान यशवंतनगर नांदेड येथे यातील फिर्यादीची बजाज पल्सर कंपणीची मो. सा. क्रमांक एम.एच.२६/एक्स ६३३१ अंदाजे किंमत २०,०००/- रुपयाची नमुद ठिकाणी लावली असता कोणीतरी आज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी डॉ. शंकरराव माधवराव मानसपुरे, वय ५१ वर्षे व्यवसाय नौकरी रा. यशवंतनगर प्लॉट नं. ३५(अ) नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. शिवाजीनगर** गुरनं १४०/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२२८२ शेख, मो.क्रं. ९८२३२५२२८२** हे करीत आहेत.

## ३)चोरी :-

**लिंबगाव :-** दिनांक १७.०६.२०१८ चे ०९.०५ ते दि. १८.०६.२०१८ रोजी चे १६.०० वा. चे दरम्यान, बीएसएनल मोबाईल टावर मौजे नाळेश्वर नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीने विधुत पुरवठा करण्यासाठीच्या एनएसपीटी कंपणीच्या २३ बॅटऱ्या किंमती अंदाजे १५,०००/-रु च्या चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी श्रीराम मारोती शिरसे, वय ५० वर्षे व्यवसाय शासकीय नौकरी उप विभागीय अभियंता रा. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. लिंबगाव** गुरनं ३८/२०१८ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/ खोले, मो.नं. ९८२३२१०४२०** हे करीत आहेत.

## ४) शासकीय कामात अडथळा :-

**अ) माहुर :-** दिनांक २८.०६.२०१८ रोजी चे १६.४५ वा. चे सुमारास नगर परिषद माहुर जि. नांदेड येथे, यातील आरोपीतानी गैरकायदयाची मंडळी जमवुन नगरपरिषदचे रिकामे जागेत लोखंडी एगंलचे पोल उभे करुन अतिक्रमण करीत असताना ते रोखले असता फिर्यादीशी हुज्जत घालुन दहशत निर्माण करुन अंगावर येवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी शेषेराव निवृती भिसे, वय ६१ वर्षे व्यवसाय नौकरी कार्यालयीन अधिक्षक नगरपरिषद माहुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. माहुर** गुरन ७०/२०१८ कलम ३५३, ३३२, १४३, १४७, ५०४, ५०६, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोउपनि/मेश्राम, मो.क्र. ९६५७७७२६४७** हे करीत आहेत.

**ब) मनाठा :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे १०.१५ वा. चे सुमारास सार्वजनिक रोड शेंदण ता. हदगाव जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा ग्रामपंचायत शेंदण येथील घरपटीची वसुली व दैनंदीन सरकारी कामकाज करीत असताना यातील आरोपीने फिर्यादीचे सरकारी कामात अडथळा निर्माण करुन थापडा बुक्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी ओंकारा शंकर स्वामी, वय ३१ वर्षे व्यवसाय ग्रामसेवक ग्रा. पं. शेंदण रा. कदमनगर हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. मनाठा** गुरन ३९/२०१८ कलम ३५३, ३३२, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/आर. डी. पांचाळ, मो.क्र. ९१५८४४४६९७** हे करीत आहेत.

## ५)आर्मस ॲक्ट

**नांदेड ग्रामीण :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी १६.०५ वा.चे सुमारास, भगतसिंग चौक नांदेड यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या आपले ताब्यात एक लोखंडी धारदार खंजर ताब्यात बाळगलेला सार्वजनिक ठिकाणी मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/गजानन काळबा मोरे, पो. स्टे. नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. नांदेड ग्रामीण** गुरनं २८५/२०१८ कलम ४/२५ भा.ह.का. प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/ २१७३ जाधव, मो.नं. ०२४६२-२२६३७३** हे करीत आहेत.

## ६) कल्याण नावाचा मटका खेळत असतांना मिळुण आले :-

**अ)हदगाव :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे १६.४५ वा. चे सुमारास तामसा टी. पॉईंट जवळ हदगाव जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या चिठ्ठयावर आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन स्वत:चे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना ४१,७४०/-रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/पांडुरंग दिंगाबर भारती, ने. स्थागुशा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. हदगाव** गुरन. १३४/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/२३४२ हंबर्डे, मो.क्र. ०२४६८-२२२३३३** हे करीत आहेत.

**ब)विमानतळ :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे १४.३० वा. चे सुमारास मामा गॅरेज पाठीमागे सार्वजनिक ठिकाणी तानाजीनगर नांदेड येथे यातील नमुद आरोपीतानी बिना परवाना बेकायदेशिररित्या चिठ्ठयावर आकडे लिहुन लोकांकडुन पैसे घेवुन स्वत:चे फायदयासाठी कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असताना २,६९०/-रुपयाचे मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/नामदेव शिवाजीराव मद्ये, ने. पो. स्टे. विमानतळ** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. विमानतळ** गुरन. १६१/२०१८ कलम १२ (अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोना/४ फारुखी, मो.क्र. ९९२३०६१४०४** हे करीत आहेत.

## ७) तिर्रट नावाचा जुगार :-

**इतवारा :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे १५.२० वा. चे सुमारास गोल्डन फंक्शन हॉल इतवारा नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असताना नगदी व जुगाराचे साहित्यासह ४,७००/- रुपयासह मिळुन आले वगैरे **फिर्यादी पोउपनि/रहीम बशीर चौधरी, ने. पो.स्टे. इतवारा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरन. १९७/२०१८ कलम १२(अ) मजुका अन्वये गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/ १०९४ पाशा,मो.क्र. ०२४६२-२३६५१०** हे करीत आहेत.

## ८) गळफास घेवुन मृत्यु :-

**तामसा :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे १५.०५ वा.चे पुर्वी मयताचे राहाते घरी मौजे कोपरा ता. हदगाव जि. नोदेड येथे यातील **मयत नामे फरहाना मुनीरखॉन पठाण, वय २६ वर्षे व्यवसाय घरकाम रा. कोपरा ता. हदगाव जि. नांदेड** ही तिचे राहते घरातील स्लॅप खालील फॅनला ओडनीने गळफास घेवुन मरण पावली. वगैरे **खबर देणार सपोउपनि/के. आर. राठोड, ने. पो. स्टे. तामसा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. तामसा** आ.मृ. १५/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास सपोनि/माने, मो.क्र. ८७८८०१४०२०** हे करीत आहेत.

## ९) पाण्यात बुडून मृत्यु :-

**मुखेड :-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे ०८.०० वा. चे सुमारास सुभेदार यांची विहीर येवती ता. मुखेड जि. नांदेड येथे यातील **मयत नामे अर्चना पांडुरंग कंधारे, वय ३२ वर्षे व्यवसाय घरकाम रा. येवती ता. मुखेड जि. नांदेड** ही विहीरीत पाणी आणण्यासाठी गेली असता तोल जावुन विहीरीत पडुन पाण्यात बुडूण मरण पावली. वगैरे **खबर देणार सुदाम मरीबा वाघमारे, वय ५५ वर्षे व्यवसाय मजुरी रा. येवती ता. मुखेड** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. मुखेड** आ.मृ. २७/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ. मृ. दाखल असुन **तपास पोहेकॉ/ पांडे मो.क्र. ७५८८०६८२५६** हे करीत आहेत.

## १०) जळुन मृत्यु :-

**हिमायतनगर:-** दिनांक २९.०६.२०१८ रोजी चे११.०० वा. पुर्वी वेळ नकी नाही मयताचे राहाते घरी मौ. महारदापुर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे, यातील **मयत नामे रेणुका सत्यानंद बुरकुले, वय १९ वर्षे रा. महादापुर ता. हिमायतनगर** ही तिचे राहाते घरी पेटवुन मरण पावली. वगैरे **खबर देणार माधव पुंजाजी धुमाळे, वय ६० वर्षे व्यवसाय शेती रा. महादापुर ता. हिमायतनगर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. हिमायतनगर** आ.मृ. २०/२०१८ कलम १७४ सिआरपीसी प्रमाणे आ.मृ. दाखल असुन **तपास पोउपनि/ बनसोडे मो.क्र. ७७७४०४७९९२** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.